# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग


Visit site >

सकाळ

# राजगुरुनगरला एड्सविषयी जागृती

**राजगुरुनगर, ता. २ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती करण्यासाठी रॅली, पथनाट्य, रांगोळी व निबंध स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी काढण्यात आलेल्या रॅलीत स्वयंसेवकांनी घोषणा देऊन जनजागृती केली. रॅलीदरम्यान ठिकठिकाणी पथनाट्ये सादर करण्यात आली. तसेच उपस्थितांना एड्सग्रस्त व्यक्तींशी मानवतेने वागण्याची शपथ देण्यात आली. महाविद्यालयात शनिवारी झालेल्या कार्यक्रमात, चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयातील समुपदेशक डॉ. शरद वाडिले यांनी विद्यार्थ्यांना एड्सपासून दूर राहण्यासाठी उपायांची माहिती सांगितली. रांगोळी स्पर्धेत हर्षदा गोपाळे, कोमल बोराडे, मयूरी कोलम, राजश्री कोळेकर यांचा प्रथम क्रमांक आला, तर निबंध स्पर्धेत काजल फापाळे हिचा प्रथम क्रमांक आला. या उपक्रमांचे आयोजन प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळूंज, प्रा. नीता डोंगरे, प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.



**राजगुरूनगर (ता. खेड) : पथनाट्ये सादर करताना स्वयंसेवक.**

Pune, District-Today
03/12/2019 Page No. 7

लोकमत

## हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा पुढाकार : रॅली, पथनाट्य, विविध स्पर्धा

# एड्सदिनानिमित्त विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेनेच्यावतीने जागतिक एड्सदिनाचे औचित्य साधून रॅली, पथनाट्य, रांगोळी व निबंध स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करुन जनजागृती करण्यात आली.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयातील समुपदेशक डॉ. शरद वाडिले, रोटरी क्लबचे अध्यक्ष नरेश हेडा, रोटेरियन सुधीर येवले, राहुल वाळुंज, अविनाश कहाणे उपस्थित होते.



जागतिक एड्सदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.

डॉ. शरद वाडिले यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही, एड्ससंदर्भात माहिती सांगितली. ग्रामीण आरोग्य रुग्णालयात आयसीटीसीच्या माध्यमातून एचआयव्ही मोफत तपासणी व उपचार केले जातात, असे सांगितले. या रोगापासून दूर राहण्यासाठीच्या उपायांची माहिती त्यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. महाविद्यालय ते पंचायत समितीपर्यंतच्या जनजागृती रॅलीत स्वयंसेवकांनी ‘वचन पाळा एड्स टाळा,’ ‘जवान हूँ नादान नही,’ ‘घटकेची मजा आयुष्याची सजा,’ रक्तदानामुळे एड्स होत नाही, मनमोकळे बोला एड्स टाळा अशा घोषणा दिल्या. यावेळी उपस्थितांना एड्सग्रस्त व्यक्तींशी मानवतेने वागण्याची शपथ देण्यात आली.

जागतिक एड्सदिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सुमारे ४८ स्वयंसेवकांची एचआयव्ही एड्स चाचणी करण्यात आली. रांगोळी स्पर्धेत हर्षदा गोपाळे, कोमल बोराडे, मयूरी कोलम, राजश्री कोळेकर यांचा प्रथम क्रमांक आला.

निबंध स्पर्धेत एड्सवर बोलू काहीही या विषयावर काजल फापाळे हिचा प्रथम क्रमांक आला. या विविध उपक्रमांचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळूंज, प्रा. नीता डोंगरे, एन. सी. सी.प्रमुख मेजर प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.

# एड्सदिनी राजगुरूनगरमध्ये विविध कार्यक्रम

**राजगुरूनगर, दि. १ (प्रतिनिधी)-** जागतिक एड्स दिनानिमित्ताने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने जागतिक विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जनजागृती रॅली, पथनाट्य, रांगोळी व निबंध स्पर्धा आदि विविध उपक्रमांचे घेत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, यांच्या उपस्थितीत करण्यात आली. डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयातील समुपदेशक डॉ. शरद वाडिले, रोटरी क्लबचे अध्यक्ष नरेश हेडा, सुधीर येवले, राहुल वाळुंज, अविनाश कहाणे उपस्थित होते. ग्रामीण आरोग्य रुग्णालयात एचआयव्हीची मोफत तपासणी व उपचार केले जातात. या रोगापासून दूर राहण्यासाठीच्या उपायांची माहिती डॉ. शरद वाडिले यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. महाविद्यालय ते पंचायत समितीपर्यंतच्या जनजागृती रॅलीत स्वयंसेवकांनी वचन पाळा एड्स टाळा, जवान हू नादान नही, घटकेची मजा आयुष्याची सजा, रक्तदानामुळे एड्स होत नाही, मनमोकळे बोला एड्स टाळा. अशा घोषणा दिल्या. जागतिक एड्स दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सुमारे ४८ स्वयंसेवकांची एचआय व्ही एड्स चाचणी करण्यात आली. रांगोळी स्पर्धेत हर्षदा गोपाळे, कोमल बोराडे, मयुरी कोलंम, राजश्री कोळेकर यांचा प्रथम क्रमांक आला तर निबंध स्पर्धेत एड्स वर बोलू काही ही या विषयावर काजल फापाळे हिचा प्रथम क्रमांक आला. या विविध उपक्रमांचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळूंज, प्रा. नीता डोंगरे, एन. सी. सी. प्रमुख मेजर प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.



**राजगुरूनगर : येथील महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.**

प्रभात Mon, 02 December 2019
epaper.eprabhat.net/c/46405390

पुढारी



राजगुरुनगर येथे पथनाट्यातून एड्सबाबत जागृतीकरताना विद्यार्थी.

# हुतात्मा महाविद्यालयात एड्सबाबत जागृती

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातर्फे रॅली, पथनाट्य, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करून एड्सबाबत जनजागृती करण्यात आली.

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. १) महाविद्यालयातील रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालय ते पंचायत समितीदरम्यान काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीत स्वयंसेवकांनी वचन पाळा एड्स टाळा, जवान हूँ नादान नहीं, घटकेची मजा आयुष्याची सजा, रक्तदानामुळे एड्स होत नाही, मनमोकळे बोला एड्स टाळा, अशा घोषणा दिल्या. तसेच, एड्सग्रस्त व्यक्तींशी मानवतेने वागण्याची शपथही या वेळी देण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सुमारे ४८ स्वयंसेवकांची एचआयव्ही चाचणी करण्यात आली. रांगोळी स्पर्धेत हर्षदा गोपाळे, कोमल बोराडे, मयूरी कोलंम, राजश्री कोळेकर यशस्वी झाल्या; तर निबंध स्पर्धेत काजल फापाळे हिचा प्रथम क्रमांक आला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयातील समुपदेशक डॉ. शरद वाडिले, रोटरी क्लबचे अध्यक्ष नरेश हेडा, रोटरीयन सुधीर येवले, राहुल वाळुंज, अविनाश कहाणे उपस्थित होते.

डॉ. शरद वाडिले यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही एड्स संदर्भात माहिती दिली. ग्रामीण आरोग्य रुग्णालयात 'आयसीटीसी'च्या माध्यमातून एचआयव्ही मोफत तपासणी व उपचार केले जातात, असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या आरोग्य विषयक प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. याचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे, एनसीसी प्रमुख मेजर प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.

My Gramin Edition
3 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख